महाज्योती
ज्ञानदीप लावू जगी

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

## भटक्या जमाती गट - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षापुर्व प्रशिक्षण योजनेचे तपशील

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षेकरीता भटक्या जमाती गट - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण मोफत ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने महाज्योती मार्फत देण्यात येणार आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

➢ **योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. विद्यार्थ्यी हा/ही महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
2. विद्यार्थ्यी हा/ही भटक्या जमाती - क (NT-C) असावा.
3. विद्यार्थ्यी हा/ही नॉन-क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा/असावी
4. विद्यार्थ्यी पदवी अभ्यासक्रम किमान 60 टक्के गुणासह उत्तीर्ण केलेला असावा/असावी.
5. महाज्योतीच्या कोणत्याही योजनांचा कोणत्याही स्वरुपात लाभ घेतलेल्या विद्यार्थ्याने चालू योजनेसाठी पुन्हा अर्ज करु नये, त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
6. विद्यार्थ्याची अंतिम निवड छाननी परिक्षेद्वारे करण्यात येईल.
7. विद्यार्थ्याचे किमान वय 21 वर्ष व कमाल वय 33 वर्ष पेक्षा जास्त असू नये. दिव्यांग व्यक्तीकरीता वय 35 वर्षापेक्षा अधिक असू नये.

➢ **लाभार्थी निवड प्रक्रिया :**

1. महाज्योती मार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी महाज्योतीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतील.
2. प्राप्त अर्जाची निकषानुसार छाननी करण्यात येईल.
3. छाननीमध्ये पात्र विद्यार्थ्यांची केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षापूर्व लेखी परीक्षेच्या धर्तीवर व अभ्यासक्रमानुसार चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
4. चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांकनानुसार मेरीटच्या आधारे व आरक्षित जागांच्या प्रमाणात पात्र विद्यार्थ्यांची यादी व प्रतीक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

➢ **प्रशिक्षणाचे स्वरूप :**

1. विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षापूर्व लेखी परीक्षांचे सुधारीत अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्यात येईल.
2. सदर प्रशिक्षण कालावधी हा 11 महिन्यांचा असेल.

3. प्रशिक्षण अनिवासी स्वरुपाचे असेल.
4. प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपाचे देण्यात येईल.
5. विद्यार्थ्यास प्रशिक्षण कालावधी दरम्यान निवास, भोजन, वाहतूक या कारणांसाठी भत्ता म्हणून प्रतिमाह रु.10,000/- (किमान 75% उपस्थिती असल्यास) इतके विद्यावेतन देण्यात येईल.
6. विद्यार्थ्यास प्रशिक्षणास रुजु झाल्यावर व संस्थेकडून रुजु अहवाल प्राप्त झाल्यावर रु.12,000/- एकवेळ आकस्मिक निधी हा प्रशिक्षण स्थळावर निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था तसेच इतर अनुषंगिक बाबींची पूर्वतयारी म्हणून देण्यात येईल.

➢ **समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे** :

1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
2. दिव्यांगाकरिता 4% जागा आरक्षित आहे.
3. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

➢ **अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**:

1. आधार कार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate)
3. रहिवासी दाखला (Domicile Certificate)
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer)
5. पदवीचे अभ्यासक्रम किमान 60 टक्के गुणासह उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक जोडावे.
6. अनाथ असल्यास दाखला
7. दिव्यांग असल्यास दाखला

➢ **अर्ज कसा करावा** :

1. महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"भटक्या जमाती गट - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परिक्षापुर्व प्रशिक्षण "** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.

➢ **अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.28/03/2024 राहील.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. प्रशिक्षणाकरीता निवड झालेले विद्यार्थी ज्या दिनांकास संस्थेत प्रशिक्षणाकरीता रुजु होतील त्या दिनांकापासुन त्यांना महाज्योतीच्या धोरणानुसार विद्यावेतन लागू होईल. तथापि प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्यांनाच विद्यावेतन देय राहिल.
5. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा

या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी 'या कडून योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

6. महाज्योतीच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतला असल्यास विद्यार्थी या प्रशिक्षणास अपात्र ठरेल.
7. नमुद निकषांची पूर्तता न करणाऱ्या, अपूर्ण अर्ज सादर करणाऱ्या किंवा अर्जासोबत कागदपत्रे न सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अर्ज बाद करण्यात येईल.
8. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न (Seeding) असणे आवश्यक आहे.
9. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर संर्पक करावा : **संपर्क क्र** - 0712-2870120/21

   **E-mail Id** : mahajyotiupsc21@gmail.com

**(राजेश खवले)**
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर